

रस्ते माणसांसाठी, वाहनांसाठी नव्हेत

(छायाचित्रे : गजेंद्र कळसकर)

# युरोप नव्हे; हे तर पुणे!

पुणे, ता. २५ : तुम्ही वृद्ध असाल... तरुण असाल... आपल्या आई-बाबांसोबत फेरफटका मारायला आलेले छोटुकले असाल किंवा अजून कुणी असाल, तरी तुमच्यासाठी इथे जागा आहे. हो, अगदी भरपूर. तुम्ही या, बसा, खूप वेळ टाइमपास करा, चित्रे रेखाटा, स्मार्ट फोनवर सर्फिंग करा, पुस्तकंही वाचा किंवा अगदी नुसतंच बसून राहा... ही युरोपमधील कल्पना आता पुणेकरांसाठी जंगली महाराज रस्त्यावर अवतरली आहे.



पूर्वी रस्त्यात येणारी हिरवीगार सावली देणारी झाडं आता रस्त्यात राहिली नाहीत. कडेला झाली आहेत. अता त्या झाडांखाली मस्तपैकी बसताही येतंय. एखाद्या बागेत असं मनमोकळं वातावरण असणं अपेक्षित असतं (आणि पुण्यातल्या अनेक बागांत ते 'मिसिंग' असतं) असं वातावरण चक्क या रहदारीच्या रस्त्यावर दिसू लागलंय...

शहरी असा शब्द म्हणण्यापेक्षा 'नागरी' असा खास ...कांकडून उधार घेतलेला शब्द वापरण्याची इच्छा व्हावी, असा हा देखणा आराखडा सध्या जंगली महाराज रस्त्यावर पाहायला मिळतोय. 'रस्ते माणसांसाठी की वाहनांसाठी' या ...नाचं उत्तर गेली अनेक वर्षं वाहनांनी 'हायजॅक' केलं होतं, ...ण आता त्यात पुन्हा एकवार माणसांनी शिरकाव केलाय... जे ...पूर्ण छान असल्याचं या रस्त्यावरच्या रचनेतून दिसून येतंय, ...से अनेक जणांचं म्हणणंय. पुणे महापालिकेने अंगीकारलेल्या ...र्बन स्ट्रीट डिझाइन गाइडलाइन्स' अंतर्गत या रस्त्याचं हे ...ललेलं रूपडं पाहायला मिळतंय.

### रस्ते म्हणजे एवढं सारं काही हवं!

- पदपथ
- सायकल ट्रॅक
- बसथांबे
- बससाठीची वेगळी लेन
- पार्किंगची व्यवस्था
- रस्ते ओलांडण्याची सुरक्षित जागा
- गतिरोधक
- वृक्षारोपण
- पाण्याची सुविधा
- कचऱ्याची व्यवस्था आणि स्वच्छतागृह

## जेव्हा लोकं म्हणतात 'वाह'!

इथल्या कमानींमधून नुसतेच चालत जा. बाकांवर बसा. एकमेकांशी समोरासमोर बसून बोला, पाठ टेकून बोला. वाटलं तर नुसते मॉर्निंग/इव्हनिंग वॉक आणि शतपावलीही करा... सेल्फी काढा! शहरात मोकळा श्वास घ्यायला आहे कुठे जागा? या प्रश्नाचं उत्तर आता जंगली महाराज रस्ता आहे. इंग्रजांच्या काळात बांधला गेलेला हा सुबक रस्ता पुन्हा एकवार आपल्या देखण्या दिवसांत गेल्याचं दिसतंय. विशेष म्हणजे त्याचं हे नवं रूपडं आता युरोपीय धाटणीत सजू पाहतंय. सुटसुटीत बसथांबा, फुलझाडं, देखणे दिवे, दुतर्फा लावलेली नवी रोपं आणि त्यासाठी खास पाण्याची सोय, रस्त्यात येणारी झाडं न कापता तशीच ठेवून, त्यांच्या बाजूने वळसा घालून जाणारा रस्ता... हे सारं पाहून अनेक जण आपसूकपणे 'वाह! क्या बात है!' अशी दाद देऊन जाताहेत.

## अर्बन स्ट्रीट गाइडलाइन

राष्ट्रीय नागरी परिवहन धोरण आणि सर्वंकष वाहतूक आराखड्यानुसार पुण्यातील रस्त्यांचे योग्य नियोजन करण्याचा हा आराखडा आहे. त्यानुसार रस्त्यांचे पुनर्विकसन होत आहे. या संपूर्ण योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे, ते पादचाऱ्यांना त्यांचा हक्क मिळवून देणे. हेच उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून 'आधी पादचारी, त्यांना पुरेशी जागा आणि त्यानंतर वाहने' या प्राधान्यानुसार रस्त्यांची रचना नव्याने केली जात असल्याचे पालिकेच्या वतीने सांगितले.

# पुणे-मुंबई अकरा मिनिटांत!

## पोलिस भरतीसाठी लेखी परीक्षा ३० एप्रिलला

पुणे, ता. २५ : पोलिस भरतीसाठी पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी (ता. ३०) सकाळी सात वाजता शिवाजीनगर पोलिस मुख्यालयात होणार आहे.